# ग्राम शिक्षण समिती

## (कर्तव्ये व अधिकार)



सर्व शिक्षा अभियान

सब पढ़ें, सब बढ़ें

## जिल्हा परिषद, लातूर

## प्रेरणा

**श्री. पंडीतराव धुमाळ**
उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती
जिल्हा परिषद, लातूर

**सौ. छायाताई चिगुरे**
अध्यक्षा
जिल्हा परिषद, लातूर

## प्रवर्तक

**जयवंत साळुंखे**
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, लातूर

**डॉ. प्रवीण गेडाम** भा. प्र. से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, लातूर

## संपादक

**कल्याण सोनवणे**
उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, लातूर

**भागवत जोशी**
उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, लातूर

## कार्यकारी संपादक

**प्रभाकर हिप्परगे**
संशोधन सहाय्यक
सर्व शिक्षा अभियान, लातूर

**राजेंद्र सूर्यवंशी**
सहाय्यक कार्यक्रम अधिकारी
सर्व शिक्षा अभियान, लातूर

## निर्मिती सहाय्य

**भारत सातपुते**
समन्वयक पर्यायी शिक्षण
सर्व शिक्षा अभियान, लातूर

**रजिया शेख**
सहाय्यक कार्यक्रम अधिकारी
सर्व शिक्षा अभियान, लातूर

मोफत वितरणासाठी : सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, लातूर

# मनोगत

गाव करील ते राव काय करील, अशी एक अथपूर्ण म्हण मराठी भाषेत प्रचलित आहे. या म्हणीस अनुसरूनच महाराष्ट्र शासनाने दि. १ फेब्रुवारी १९९० व ७ सप्टेंबर १९९१ च्या शासन निर्णयाने स्थापन केलेली ग्राम शिक्षण समिती ही ग्राम पातळीवरची अत्यंत महत्त्वाची समिती आहे. या समितीस शासनाने गावातील शैक्षणिक विकासासाठी व शासनातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या निधीचा योग्य वापर व्हावा यासाठी मोठ्याप्रमाणावर अधिकार प्रदान केले आहेत. या अधिकारांची जाणीव बराच वेळा समिती सदस्यांना नसल्याचे निदर्शनास आले आहे. ग्राम शिक्षण समिती सदस्यांना आपल्या अधिकाराची जाणीव झाल्यास निश्चितच शैक्षणिक विकासास गती मिळेल यात शंका नाही. ग्राम शिक्षण समितीच्या कार्यात जसे अधिकार महत्त्वाचे आहेत त्यापेक्षा, किंबहुना त्याही पेक्षा जास्त महत्त्व, कर्तव्यास आहे. ज्या ज्या गावामध्ये ग्रामशिक्षण समितीने आपले कर्तव्या चोखपणे, समर्पण वृत्तीने पार पाडलेले आहेत, त्या त्या गावात शैक्षणिक विकासामध्ये चमत्कार घडलेले आहेत. शाळेबरोबरच गावाचाही कायापालट झालेला आहे.

शाळेला गावाचा आधार असावा, गावाला शाळेचा अभिमान असावा ही उक्ती खऱ्या अर्थाने सार्थ करण्यासाठी ग्राम शिक्षण समितीने अधिकाराची जाण ठेवून कर्तव्य बुद्धीने काम करण्यासाठी, या पुस्तिकेतून ग्राम शिक्षण समितीचे अधिकार व कर्तव्ये यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत लोक प्रतिनिधींचे प्रशिक्षण या उपक्रमातून या पुस्तिकेची निर्मिती करण्यात आलेली असून यात शाळेशी व शिक्षणाशी संबंधीत महत्वाच्या योजनांची ठळक स्वरुपात माहिति देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातून प्रेरणा घेवून विविध योजनांची परिपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न ग्राम शिक्षण समिती अध्यक्ष व सदस्यांनी तसेच शिक्षणाशी संबंधीत सर्वांनी करावा ही अपेक्षा व्यक्त करतो व त्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो !

**डॉ. प्रवीण गेडाम**
(भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद लातूर



## शिक्षण खात्याची रचना

- जिल्हा — जिल्हा परिषद (शिक्षणाधिकारी प्राथमिक)
  ↓
- तालुका — गट साधन केंद्र (गटशिक्षणाधिकारी)
  ↓
- केंद्र — केंद्रीय शाळा (केंद्रप्रमुख) (१० ते १२ शाळांसाठी)
  ↓
- शाळा — (मुख्याध्यापक)

## ग्राम शिक्षण समिती

- प्रत्येक गावासाठी एक ग्राम शिक्षण समिती नेमण्यात आलेली आहे.
- गावात एकापेक्षा अधिक शाळा असल्या तरीही ग्राम शिक्षण समिती एकच असावी.
- गाव पातळीवरील समस्या गावपातळीवरच सोडवाव्यात व त्यासाठी तालुका किंवा जिल्हा स्तरावर येण्याची गरज भासू नये यासाठी ही समिती स्थापन केलेली आहे.
- समितीचा कार्यकाळ तीन वर्षाचा असतो.
- समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घ्यावी. समितीच्या बैठकीच्या आदल्या दिवशी चावडीवाचन घ्यावे.

## ग्राम शिक्षण समितीची रचना

- समितीमध्ये ५ ते १५ सदस्य असावेत.
- सदस्यांची निवड ग्रामसभा करते.
- सरपंच हा समितीचा पदसिध्द अध्यक्ष असतो.
- ५०% सदस्य महिला असाव्यात.
- इतर सदस्य

१. पालक, २. ग्रा.पं.सदस्य, ३. शिक्षक, ४. निवृत्त शिक्षक, ५. गावातील सर्वाधिक शिकलेली व्यक्ती, ६. युवक प्रतिनिधी, ७. अ.जा./अ.ज/भ.ज/वि.ज.प्रतिनिधी, ८. अल्पसंख्यांक प्रतिनिधी, ९. अंगणवाडी सेविका, १०. प्रौढ/ अनौपचारिक शिक्षणाचा शिक्षक, ११. स्थानिक शैक्षणिक/स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी

## ग्राम शिक्षण समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

- शिक्षकांवर प्रशासकीय नियंत्रण.
  - तीन महिन्यातून एकदा उपस्थितीपत्रे तपासणे.
  - अध्यापक दैनंदिनी (टाचण वही) चे बैठकीत आवलोकन करावे.
  - मुख्याध्यापकांची किरकोळ रजा मंजूर करणे.
  - मुख्याध्यापकाची वैद्यकीय आणि दीर्घ मुदतीच्या रजेची शिफारस करणे.
  - चांगल्या आणि असमाधानकारक कामकाज व वर्तणूकीबाबत ग.शि.अ.यांना कळविणे.





- गावातील सहा वर्षे पूर्ण झालेल्या सर्व मुलांना शाळेत प्रवेश देणे.
  - एकही मूल शाळाबाह्य रहाणार नाही ही समितीची जबाबदारी आहे.
  - यासाठी पटनोंदणी मोहीम हाती घेणे. टिकवणूक १००% आणि गळती ०% ठेवणे.
- मुलांची सरासरी उपस्थिती किमान १००% टिकवणे.
  - कमी उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची भेट घेऊन अडचण सोडविणे आणि त्यांना नियमित शाळेत आणणे.
- विद्यार्थ्यांची संपादणूक उत्कृष्ट ठेवणे.
  - वर्गातील किमान ९०% मुलाना ७५% पेक्षा अधिक गुण मिळावेत.
  - अप्रगत विद्यार्थ्यांसाठी जादा वर्ग घेणे.
- शैक्षणिक गुणवत्ता उत्कृष्ट ठेवणे.
  - उत्कृष्ट परिपाठ घेणे. (सर्व शाळांना जि.प.प्रा.शा.कव्हा ता.लातूर येथील परिपाठाची C.D.दिलेली असून ती सर्वांनी पाहावी.)
  - नंदादीप उपक्रम (सर्व शाळांना याबाबत माहितीपुस्तिका दिलेली आहे. त्याचे वाचन करावे.)
  - इयत्ता ४ थी व ७ वी च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विशेष तयारी करणे.
  - सर्व मुलाचे परीक्षा शुल्क जि.प.ने भरलेले आहेच.
  - शाळेची उत्कृष्ट सजावट व रंगरंगोटी करणे.
- वर्गखोल्या बोलक्या करणे.






वर्गखोलीत शैक्षणिक साहित्याची मांडणी योग्य प्रकारे केलेली असावी.






वर्गातील भिंतीवर विद्यार्थ्यांसाठी फलक असल्यास उत्तम.

वर्गातील भिंतीवर अभ्यासक्रमातील तक्ते लिहावेत.





वर्गातील भिंती व कोपरे बोलके असावेत.




- शाळेत वृक्षारोपण, बाढीचे कुंपण तयार करणे.
- स्वच्छतागृह (शौचालय आणि मुताऱ्या) यांची उत्कृष्ट निगा राखणे. तसेच विद्यार्थ्यांकडून रोज परिपाठापूर्वी शाळेचा सर्व परिसर स्वच्छ करुन घेणे. सर्व विद्यार्थ्यांना सक्तीने स्वच्छतागृहाचा वापर करावयास सांगावे. (सवयीसाठी)




मुलांसाठी स्वतंत्र मुतारी व शौचालय असावे.

मुलींच्या मुतारीसाठी लेडीज पॅन वापरावेत.





स्वच्छतागृहामध्ये दोन ते तीन फूट उंचीपर्यंत टाईल्स लावणे बंधनकारक.









सांडपाण्या
पासून
शाळेला
परसबाग
असावी.



वृक्षारोपण



शालेय परिसर
सुंदर
दिसण्यासाठी
वृक्षारोपण
करावे.

शाळेला
वृक्षारोपण
बाढीचे
कुंपण
असावे.















- शाळेत उत्कृष्ट वाचनालय आणि प्रयोगशाळा तयार करणे (याबाबत सर्व शाळांना मार्गदर्शक पुस्तिका देण्यात आल्या आहेत त्याचे वाचन करावे.)
- वाचनालय आणि प्रयोगशाळा यांचा नियमित व सुयोग्य वापर सर्व विद्यार्थ्यांकडून करुन घेणे.


- शाळेत उत्कृष्ट वाचनालय आणि प्रयोगशाळा तयार करणे (याबाबत सर्व शाळांना मार्गदर्शक पुस्तिका देण्यात आल्या आहेत त्याचे वाचन करावे.)
- वाचनालय आणि प्रयोगशाळा यांचा नियमित व सुयोग्य वापर सर्व विद्यार्थ्यांकडून करुन घेणे.




शालेय वाचनालयात विविध पुस्तके मांडलेली असावीत.



शालेय वाचनालयाचा नियमित वापर करावा.





प्रयोग
शाळेत
विद्यार्थ्यांना
साहित्य
हाताळण्यास
द्यावे.



प्रयोग
शाळेत
विद्यार्थ्यांना
साहित्य
हाताळण्यास
द्यावे.



संगणकावर
काम करण्याची
संधी
प्रत्येकाला
मिळावी.



- शाळेत संगणक असल्यास चालू स्थितीत ठेवणे. नियमित वीज पुरवठा असावा.
- सर्व शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण दिलेले आहेच, शिवाय संगणक वापराबद्दल उत्कृष्ट माहितीपुस्तिका व C.D. ही दिलेली आहे.
- आपल्या शाळेत असा प्रशिक्षित शिक्षक नसल्यास आपण विनंती केल्यास जि.प. तर्फे प्रशिक्षणाची सोय करण्यात येईल.
- शाळेतील सर्व मुलांना आठवड्यातून किमान एक तास संगणकावर स्वत: बसता येईल याची काळजी घ्यावी व तसे वेळापत्रक बनवावे.
- मुलांना संगणकाचे ज्ञान देण्यात येईल याची काळजी घ्यावी.
- लोकसहभागातून शाळेच्या उपयोगाची कामे करावित. जसे –
  - – मुलांना बसण्यासाठी बाक
  - – खेळणी
  - – पुस्तके
  - – शैक्षणिक साहित्य (पाट्या, लेखणी, वह्या, दप्तर इत्यादी)
  - – प्रयोगशाळेचे साहित्य (फुगा, सुई व दोरा,भिंग,मसाल्याचे पदार्थ,धान्याचे प्रकार इ.)
  - – शालेय पोषण आहारासाठी पैशाच्या, धान्याच्या किंवा भाजीपाल्याच्या स्वरुपात मदत.
- लोकसहभागातून वस्तू किंवा रोख स्वरुपात घेता येईल.



संगणकाविषयी प्राथमिक स्वरुपाचे ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावे.

## ग्राम शिक्षण समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या (इतर)

- शालेय बांधकामावर देखरेख करणे.
- उपस्थिती भत्त्याचे वाटप झाले आहे अथवा नाही याची तपासणी करणे.
- शाळाबाह्य मुलांची यादी निश्चित करणे.
- शाळा अनुदान, शिक्षक अनुदान, देखभाल दुरुस्ती अनुदान, ४% सादील इत्यादी खर्चास मान्यता देणे.
- पर्यायी शिक्षण हमी केंद्रास शिफारस देणे.
- वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकास मंजूरी देणे.





## चावडी वाचन

- शाळेची गुणवत्ता तपासण्याचा सर्वोत्कृष्ट उपक्रम.
- चावडी वाचनाच्या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सर्व गावकऱ्याच्या व पालकांच्या  समोर तापसली जाते.
- पूर्वतयारी
  - चावडी वाचन होणार असल्याबाबत गावात दवंडी देणे आणि ग्राम पंचायत व इतर महत्वाच्या ठिकाणी जाहीर सूचना लावणे.
  - चावडी वाचनाच्या कार्यक्रमा बाबत सर्व पालकांना पत्र देणे.
  - मेगाफोन किंवा माईक व स्पिकरची व्यवस्था करावी.
  - शाळेतील सर्व वर्गाची व सर्व विषयाची पुस्तके, मासिके, त्या दिवशीची वृत्तपत्रे  गोळा करावित.
  - खडू आणि मोठ्या फळ्याची व्यवस्था करावी.
  - विद्यार्थ्यांचे अत्यंत हुशार, माध्यम व साधारण (अभ्यासात कच्ची) असे तीन गट करावेत (अस्खलित वाचणारे, अडखळत वाचणारे व वाचना न येणारे (प्रगत, अप्रगत असलेले व अद्यापि अप्रगत)
  - बैठक व्यवस्था.
  - स्थानिक जि.प./पं.स.सदस्य, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख यांना बोलवावे.
- चावडी वाचन शक्यतो गावाच्या मध्यवर्ती ठिकाणीच घ्यावे. (उदा.मंदीर, चावडी), शाळेच्या प्रांगणात घेऊ नये.
- चावडी वाचन सकाळी ८.०० वा. परिपाठाने सुरु करावे.








● सर्वप्रथम मुख्याध्यापकानी शाळेच्या गतवर्षीच्या व यावर्षी चावडी वाचनापर्यंत झालेल्या सर्व परीक्षांचे व चाचण्यांच्या निकालाचे तपशिलवार जाहीर वाचन करावे.

● चावडी वाचनाला सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत व ग्राम शिक्षण समितीचे सर्व सदस्य, गावातील सुशिक्षित व शिक्षणप्रेमी व्यक्ती, निवृत्त शिक्षक/कर्मचारी आणि जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे.

● चावडी वाचनाचे वेळी एक-एक करुन, विद्यार्थ्याला सर्वांसमोर (फळ्यासमोर) बोलवावे.

– त्याला त्याच्या वर्गाप्रमाणे प्रश्न विचारावित आणि त्याची उत्तरे फळ्यावर लिहिण्यासाठी सांगावे.

– त्याला त्याच्या वर्गाचे पुस्तक आणि त्यादिवशीचे वृत्तपत्र किंवा कोणतेही पुस्तक सर्वांसमोर वाचण्यासाठी सांगावे.

● विद्यार्थ्याला समोर बोलावल्यावर त्याच्यावरील दडपण दूर होईल आणि तो मोकळेपणाने बोलू शकेल असे सोपे प्रश्न विचारावेत. (उदा.त्याचे नाव, गाव, कुटूंबाची माहिती इत्यादी)

● त्यानंतर हळूहळू प्रश्ने कठीण करावित.

● अचूक उत्तर दिल्यावर मुलाचे कौतूक करावे व उत्तर येत नसल्यास योग्य ती Hint द्यावी.

● सर्वप्रथम पुढील मुलांनाच बोलवावे.

– अप्रगत असलेले विद्यार्थी

– अप्रगत मधून प्रगत झाले असे दाखविलेले विद्यार्थी

– ग्रामस्थांच्या माहितीप्रमाणे अभ्यासात मागे असलेले विद्याथी.

● विद्यार्थ्यांना त्याला हमखास उत्तर येणे अपेक्षित आहेत असे प्रश्न विचारावित व वाचन करावयास सांगावे. (उदा. दुसरीच्या विद्यार्थ्याला पहिलीच्या पुस्तकातील प्रश्नाची उत्तरे विचारावित आणि पहिलीची पुस्तके वाचण्यास सांगावीत.

● शिक्षकाने अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शासनाने नियोजित वेळापत्रक आखून दिलेले आहे. हे वेळापत्रक सर्व मुख्याध्यापकांना दिलेल्या मु.अ.मार्गदर्शिकेच्या पान क्र.२२ ते ३५ वर दिलेले आहे. त्यानुसार अभ्यासक्रम मागे असल्यास शेवटी अभ्यासक्रम अपूर्ण राहतो किंवा कमी वेळेत अधिक धडे शिकविल्यामुळे मुलांना नीट समजत नाही.



● सर्व शिक्षकांची टाचणवही आदल्या दिवशीपर्यंत पूर्ण असावी.

● कितीही वेळ लागला तरीही सर्व मुलांचे चावडीवाचन होईलच याची दक्षता घ्यावी.

● समाधानकारक आणि असमाधानकारक अशा दोन्ही प्रकारच्या कामाचा अहवाल केंद्र प्रमुखांना द्यावा.







- वर्गातील मुलांची गुणवत्ता चांगली आढळल्यास त्या वर्गाच्या शिक्षकांचा सत्कार व कौतुक करावे. तसेच गुणवत्ता असमाधानकारक असल्यास त्या वर्गाच्या शिक्षकाकडून गुणवत्ता वाढीसाठी तो काय प्रयत्न करणार याचे कालबध्द नियोजन घ्यावे आणि त्याप्रमाणे काम होत आहे की नाही ते वरिष्ठांना कळवावे.
- सर्व पालकांना त्यांच्या मुलाची गुणवत्ता कशी आहे त्याची जाणीव करुन द्यावी.
- शेवटी सरपंच आणि मुख्याध्यापक यांनी चावडीवाचनाच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबींवर भाष्य करीत समारोप करावे.
- दर दीड ते दोन महिन्यामध्ये चावडी वाचन घ्यावे.
- चावडी वाचनाचा उद्देश चुका काढणे हा नसुन आढळून आलेल्या त्रुटींवर सखोल चर्चा करुन त्या त्रुटी दूर करण्यासाठी जबाबदाऱ्या निश्चित करणे हा आहे. ही जबाबदारी त्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांवर आहेच, तथापी गावातील नागरिकांनीही यात निश्चित जबाबदारी उचलणे आवश्यक आहे.
- नियमित आणि व्यवस्थितपणे घेतलेल्या चावडी वाचनापेक्षा शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा टिकविण्याची अत्यंत महत्वाची जबाबदारी ग्राम शिक्षण समितीवर आहे.

**चावडी वाचनात ग्रामस्थांच्या सहभाग मोठ्या प्रमाणात असावा.**





## प्रकल्प भेटी

- परिसरातील प्रकल्पांची यादी तयार करणे. (ग्राम पंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय, पोस्ट ऑफीस, बँक, कुक्कुट/शेळी पालन केंद्र, सोसायटी, गुऱ्हाळ, दुध डेअरी, कारखाने, फळबागा/आधुनिक शेती, खडी केंद्रे, सुतमील, राशन दुकाने इत्यादी)
- इयत्तानिहाय प्रकल्प भेटींचे नियोजन करणे व त्या ठिकाणी भेटीत मिळालेल्या अनुभवाचे संकलन करावे.
- प्रकल्प भेट देण्यापूर्वी संबंधीत प्रमुखांची किंवा प्रकल्प मालकांची पूर्व परवानगी घ्यावी.



मळणी यंत्र, गुऱ्हाळ, कुक्कुट पालन यासारख्या प्रकल्पांना भेटी द्याव्यात.

## निसर्ग शाळा

### पूर्वतयारी

- निसर्ग सहलीसाठी ठिकाण निश्चित करणे.
- त्या ठिकाणाचा विचार करता इयत्तानिहाय कोणते शैक्षणिक अनुभव देता येतील याची यादी तयार करणे.
- सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
- विद्यार्थ्यांना निरीक्षणे व उपक्रम नोंदीसाठी वही व पेन घेण्यास सांगावे.
- सहलीत विद्यार्थ्यांना इजा होणार नाही व निसर्गहानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. सोबत प्रथमोपचार पेटी घ्यावी.
- निसर्गसहलीस स्थानिक पदाधिकाऱ्यांना निमंत्रीत करावे.
- निसर्गसहल दोन कि.मी.च्या आत आयोजित करावी.





## निसर्ग शाळेतील कृती

- परिसराचा परिचय करुन देणे.
- परिसरातील दगड, माती, वनस्पती, पक्षी, प्राणी, पीके यावर त्यांचे प्रकार, दर्जा, गुणधर्म व उपयोग यावर विद्यार्थ्यांशी खुली चर्चा करणे.
- पर्यावरण व मानवी जीवन यातील सहसंबंध स्पष्ट करणे.
- मुलांना स्वत: होवून ज्ञान प्राप्त करुन घेण्याची सवय लावणे.
- सहजीवन, सहकार्य, लिंग समभाव, जातीय सलोखा इत्यादी रुजवीणे.
- अभ्यासपूर्वक खेळातून आनंददाई व मनोरंजक अध्यापन करणे.
- ओझ्याविना अध्ययन व चार भिंतीबाहेरील शिक्षण देणे.
- निसर्ग शाळेतून परतल्यावर लगेच एक–दोन दिवसात आलेले अनुभव व नवीन माहिती विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिहावयास लावणे.
- एका आदर्श लेखनाचे परिपाठात वाचन करणे.




निसर्गाच्या सानिध्यात निसर्गाची माहिती द्यावी.



निसर्गाच्या सानिध्यात विविध खेळ घ्यावेत.





## शालेय पोषण आहार

- इ. १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व शासकीय, जि.प., न.प. व खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जातो.
- इ. १ ली ते ५ वी पर्यंतच्या प्रति विद्यार्थी १०० ग्रॅम प्रतिदिन तांदूळ शिजवून द्यावा. त्यातून ४५० कॅलरीज व १२ ग्रॅम प्रोटीन्स प्रतिविद्यार्थ्यांना मिळावेत. त्यासाठी दर्जेदार खिचडी दिली जावी.
- इ. ६ वी ते ८ वी पर्यंत प्रतिविद्यार्थी १५० ग्रॅम प्रतिदिन तांदूळ शिजवून द्यावा. त्यातून ७०० कॅलरीज व २० ग्रॅम प्रोटीन्स प्रतिविद्यार्थी मिळावेत. त्यासाठी दर्जेदार खिचडी दिली जावी.
- इ. १ ली ते ५ वी साठी व ६ वी ते ८ वी साठी अनुक्रमे शालेय पोषण आहार शिजवूनदेणे व इतर बाबीसाठी प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु.२/– व २.५० रु. प्रमाणे अनुदान केंद्र व राज्य शासनाकडून दिले जाते.
- प्रतिदिन प्रतिविद्यार्थी देय अनुदानाच्या २५% खर्च मानधन व इंधन यावर खर्च करावा व ७५% रक्कम खिचडी दर्जेदार होण्यासाठी दाळी, पालेभाज्या, मसाल्याचे पदार्थ व पूरक पोषण आहार यावर करावा.
- पूरक पोषण आहार अंतर्गत केळी/अंडी आठवड्यातून एक दिवस द्यावीत.
- शालेय पोषण आहार व पूरक पोषण आहार नोंद रजिस्टर अद्ययावत ठेवावे.
- शालेय पोषण आहार शिजवून देण्याची व्यवस्था ग्रामशिक्षणसमितीने करावी.




शालेय पोषण आहार शिजविण्या साठी स्वतंत्र किचनशेड बांधलेले असावे.

शौचानंतर व जेवणापूर्वी हात धुण्यासाठी वॉश बेसीन असावे.













ग्राम शिक्षण समितीने स्वयपाकासाठी एका व्यक्तीची नेमणूक करावी.


## शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी

- सर्व शाळातील पूर्व माध्यमिक शाळेतील एक व माध्यमिक शाळेतील दोन अशा तीन शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.
- ऑगस्ट २००८ पासून शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यासाठी शाळांमधून तयारी करुन घेण्यात येत आहे.
- २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील सराव चाचणी पेपरमधील प्रश्न सोडवून घेतले जात आहेत.
- २००८-०९ या शैक्षणिक वर्षात प्रत्येक शाळेकडे शिष्यवृत्ती तयारीसाठी विविध पुस्तके (नवनीत इ.) मुख्याध्यापकांना उपलब्ध करुन दिली आहेत.
- २००८-०९ या शैक्षणिक वर्षात १००% विद्यार्थ्यांच्या चार सराव परीक्षा घेण्याचे ठरले आहे. (नोव्हेंबर ०८ ते जानेवारी ०९)
- प्रत्येक तालुक्यातून चार चाचण्यांमधून सरासरीने पुढे असणारे पूर्व माध्यमिक ५० व माध्यमिक ५० विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांचे १ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २००९ या कालावधीत निवासी मार्गदर्शन शिबीर घेण्याचे निश्चित केले आहे.
- जि.प.शाळांतील ४ थी व ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या सर्व मुलांचे परीक्षा शुल्क जि.प.च्या सेस फंडातून व सर्व शिक्षा अभियान च्या अनुदानातून भरलेले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव होण्यासाठी वेळोवेळी चाचण्या घ्याव्यात.







## शाळेकडे उपलब्ध होणारा निधी

- शिक्षक अनुदान
- शाळा अनुदान
- दुरुस्ती अनुदान
- ४% सादील
- याशिवाय अधिकाधिक लोकवाटा गोळा करण्याचा प्रयत्न करावा.

### शिक्षक अनुदान

- प्रतिवर्ष प्रतिशिक्षक रु. ५००/-
- खर्चाचे अधिकार शिक्षकाचे स्वत:चे आहेत.
- यातील पुढील बाबींवर खर्च करता येऊ शकतो. (कात्री,सुई,दोरा,कागद,मणी, हार्डबोर्ड इत्यादी)
- शिक्षकांनी तयार केलेल्या साहित्याची नोंद मुख्याध्यापकांनी स्वतंत्र नोंदवहीत घेणे आवश्यक आहे.
- या खर्चाचा हिशोब पावत्या शिक्षकांकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी मु.अ. यांची आहे.
- नंदादीप उपक्रमाचे चार फलक २ बाय ३ आकाराचे हार्डबोर्डचे तयार करावेत. चार रंगाचे वेलवेट कापड लावावे.

### शाळा अनुदान

- शाळा अनुदान शाळेच्या प्रकारानुसार दिले आहे.
- प्रति वर्ष प्रति शाळा इ. १ ते ४ साठी रु. ५०००/- व इ. ५ ते ७ साठी रु. ७०००/- दिले जातात. शाळा १ ते ७ असल्यास रु. १२०००/- दिले जातात. खर्चाचे अधिकार ग्राम शिक्षण समितीच्या मान्यतेने मुख्याध्यापक यांना आहेत.
- यातील पुढील बाबींवर खर्च करता येऊ शकतो. (शिक्षकांना आवश्यक साहित्य, अध्ययन साहित्य, शैक्षणिक खेळणी, क्रीडा साहित्य, साहित्य पेट्या व हत्यारे, वाचनालयासाठी पुस्तके,फर्निचर व अन्य साहित्य, संगीत विषयक साहित्य, शिवण कामासाठी लागणाऱ्या वस्तू, प्रथमोपचार पेटी, बागकाम हत्यारे, बालवीर व वीरबाला पथकासाठी आवश्यक साहित्य,पुस्तक बांधणी साहित्य, विज्ञान तक्ते)
- वरील पैकी ग्राम शिक्षण समिती व मु.अ.यांनी वाचनालयाची पुस्तके, प्रयोगशाळा साहित्य, बांधकाम साहित्य इत्यादी बाबींवरच प्राधान्याने खर्च करावा.





### देखभाल व दुरुस्ती अनुदान

- तीन वर्ग खोल्यापर्यंत रु. ६०००/-
- चार वर्ग खोल्यापर्यंत रु. ७५००/-
- पाच वर्ग खोल्यापर्यंत रु. ९०००/-
- सहा वर्ग खोल्यापर्यंत रु. १०,५००/-
- सात किंवा अधिक खोल्यापर्यंत रु. ११,२५०/-
- शौचालय दुरुस्ती व वापर, पिण्याचे पाणी, छत गळती, विज्ञान प्रयोगशाळा, शाळा तेथे वाचनालय, शालेय बगिचा, खेळाचे साहित्य इत्यादी बाबींवर प्राधान्याने खर्च करावा.

### ४ % सादील अनुदान

- ४% रक्कम दोन हप्त्यात शाळांना दिली जाते.
- ४% रक्कम खर्च करतांना ६०% रक्कम टिकाऊ साहित्यावर व ४०% रक्कम वापरुन संपणाऱ्या साहित्यावर खर्च करावी असे शासनाचे निर्देश आहेत.
- शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.पीआरई १०९४/७०४ (दोन) प्राशि-१, दि. १४-११-१९९४ अन्वये दिलेल्या बाबींपैकी ज्या बाबी खरेदी करावयाचे आहेत त्याची यादी तयार करुन त्या यादीस ग्रा.शि.स.मध्ये मान्यता घेऊन खरेदी विहीत पध्दतीने करावी.

## शालेय विकासाचा पंचवार्षिक आराखडा तयार करणे

### सर्वसाधारण उद्दिष्टे

- १०० टक्के पटनोंदणी व उपस्थिती व ० % गळती.
- इयत्ता १ ली ची १००% मुले ५ वर्षानंतर इ.५ वीत दाखल.
- पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती व नवोदय १००% निकाल. या परीक्षात

- २०% मुलांना ९०% च्या वर गुण.
- ३०% मुलांना ७५% पेक्षा जास्त गुण.
- २५% मुलांना ५०% पेक्षा जास्त गुण. उर्वरित सर्व उत्तीर्ण होणे आवश्यक.
- ४ थ्या वर्षापासून प्रत्येक वर्गातील प्रत्येक मुलाना ९०% च्या वर गुण सत्र परीक्षा व चाचणी परीक्षेत मिळालेच पाहिजे.

### सांस्कृतिक उद्दिष्टे

- राष्ट्रगीत/प्रतिज्ञा
- प्रत्येक मुलास १२ राष्ट्रभक्तीपर गीते तालास्वरासह पाठ असावेत.
- प्रत्येक मुलास प्रत्येक वर्षीच्या प्रत्येक भाषेच्या महत्वाच्या १० कविताचे पाठांतर
- प्रत्येक मुलास प्रत्येक वर्षीच्या प्रत्येक भाषेच्या २० निबंधाचा सराव.
- प्रत्येक मुलास प्रत्येक वर्षीच्या प्रत्येक भाषेचे २० उतारे.
- प्रत्येक भाषेचे १० प्रमाणे ३० नाट्यछटा.
- विषय ठरवून ४५ छोट्या भाषणाचा सराव.





## क्रीडा उद्दिष्टे

- प्रथम सत्रात २ व द्वितीय सत्रात २ क्रीडा प्रकारांची माहिती/सराव स्पर्धा/नैपुण्य /असे प्रत्येक मुलास २० क्रीडा प्रकार आले पाहिजेत.
- योगासने – २० आसनांचा सराव.
- ४ थ्या वर्षापासून प्रत्येकास वरील सर्व प्रकार आले पाहिजेत.

## माहिती व तंत्रज्ञान उद्दिष्टे

- संगणकाची ओळख सैध्दांतिक (Theory) व प्रात्यक्षिक माहिती, सराव.
- की बोर्डची व माऊसची ओळख व सराव.
- पेंट ब्रश, विविध Programme उघडणे
- सी.डी.उघडणे व पाहणे.
- Internet उघडणे, कार्यक्रम पाहणे. Download करणे.
- स्वत:चा ई–मेल आयडी तयार करता येणे.
- संगणकावरील छोटे –छोटे खेळ खेळता येणे.

# शालेय विकासाचा पंचवार्षिक आराखडा तयार करणे

**दरवर्षी खालीलप्रमाणे माहेनिहाय नियोजन व अंमलबजावणी करावी.**
**(माहे मे, जून, जुलै व ऑगस्ट)**

## भौतिक



- छत वर्ग खोल्या, दुरुस्ती गळणार नाही याची काळजी.
- पिण्याचे पाणी, विद्युत, स्वच्छता गृहाचा नियमीत वापर.
- परिसर स्वच्छता
- किरकोळ दुरुस्ती
- असल्यास टेप, रेडिओ, संगणक, दूरदर्शन संच, वाद्य, दुरुस्ती व नियमित वापर
- अचूक व सस्वर राष्ट्रगीत व प्रतिज्ञा

## शैक्षणिक

- सर्वेक्षण
- १००% पटनोंदणी
- १००% उपस्थिती
- ०% गळती
- अप्रगत मुलांचा शोध
- नेमके कोणते विद्यार्थी कोणत्या घटकात कच्चे याचा शोध घेणे व नोंदी करणे.
- शिक्षक/गावातील शिक्षित शिक्षक – पालक संघ सदस्यांना अप्रगत मुले दत्तक घेऊन उजळणी वर्ग घेणे
- चाचण्या.






## शालेय विकासाचा पंचवार्षिक आराखडा तयार करणे

### (माहे सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर)

**शैक्षणिक**

- शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी वर्ग, सराव, चाचण्या.
- दररोज एक तास एखादा खेळ निवडून त्याचा सराव व त्याची पूर्ण माहिती असे एकूण तीन खेळ.
- तीन राष्ट्रभक्तीपर गीते, तीन प्रार्थना गीते, पाठांतर व तालास्वरात म्हणण्याचा सराव.
- तीन भाषेतील तीन छोट्या शालेय एकांकिका/ नाटीका बसवून सराव
- परीक्षेची तयारी
- प्रथम सत्र परीक्षा.

### (माहे जानेवारी, फेब्रुवारी)

**शैक्षणिक**

- शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षेचा अभ्यासक्रम, डिसेंबर महिन्यात संपवणे
- जानेवारी – प्रथम पंधरवाड्यात शिबीर
- जानेवारी १५ ते फेब्रुवारी १० – सराव चाचण्या.
- सराव परीक्षा
- क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा व सादरीकरण.

### (माहे मार्च, एप्रिल)

**शैक्षणिक**

● परीक्षेची पूर्वतयारी ● सराव वर्ग ● सराव चाचण्या ● चाचण्यांचे विश्लेषण
● अप्रगत/कच्च्या मुलांसाठी विशेष उपक्रम, सराव ● द्वितीय सत्र परीक्षा.


## शालेय विकासाचा पंचवार्षिक आराखडा

**आर्थिक नियोजन व निधीचा योग्य वापर**

- वर उल्लेख केल्याप्रमाणे शाळांना ४ ते ५ प्रकारचा निधी प्राप्त होतो.
- या निधीचा काटकसरीने, योग्य व शाळेच्या गरजा प्राधान्य क्रमाने पूर्ण होतील अशा पध्दतीने वापरणे आवश्यक आहे.
- यासाठी स्थानिक परिस्थिती नुसार शाळेच्या गरजा निश्चित करणे.
- त्यांचा प्राधान्य क्रम ठरवणे.
- निधी उपलब्धता व गरजा यांचा ताळमेळ घालणे.
- आवश्यक गरजा प्राधान्य क्रमाने पूर्ण करणे.
- गरज असेल तेथे लोक वाटा उभारुन कामे पूर्ण करणे.









## राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना

- सर्व मान्यताप्राप्त शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा विमा शासनाने उतरवला असून विद्यार्थ्यास केंव्हाही अपघात झाल्यास तो योग्य त्या नुकसान भरपाईसाठी पात्र.
- सदरील योजना दिवसाचे २४ तास लागू आहे.
- विद्यार्थ्यास अपघात झाल्यानंतर सात दिवसाच्या आत संबंधित विमा कंपनीस अपघाताची सूचना देणे आवश्यक
- विमा कंपनीस कोणत्याही प्रकारचे शुल्क शाळेने भरण्याची गरज नाही.


### विद्यार्थ्यांस मिळणारे लाभ

- अपघाती मृत्यू :- रु. ३०,०००/-
- कायमस्वरुपी अपंगत्व रु. ५०,०००/-
- एक अवयव निकामी झाल्यास रु. २०,०००/-
- शस्त्रक्रिया रु. १०,०००/-
- किरकोळ वैद्यकीय खर्च रु. २०००/-
- अपघातात पुस्तके हरवल्यास रु. ३५०/-
- अपघातात सायकल चोरी/नुकसान झाल्यास रु. १५००/-
- अपघातात चष्मा हरवल्यास रु. ७५०/-

### महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| अ. क्र. | नाव व हुद्दा | कार्यालय | मोबाईल |
|---|---|---|---|
| १ | डॉ. श्री. प्रवीण गेडाम<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. लातूर | २४२९७० | ९७६६६२०००० |
| २ | श्री. जे. डी. साळुंखे<br>शिक्षणाधिकारी (प्रा.), जि. प. लातूर | २४५३०१ | ९८२२३३७१६४ |
| ३ | श्री. भागवत जोशी<br>उपशिक्षणाधिकारी, जि. प. लातूर | २४६३६० | ९४२३३५०८१९ |
| ४ | श्री. कल्याण सोनवणे<br>उपशिक्षणाधिकारी, जि. प. लातूर | २४६३६० | ९४२३३४२१७० |
| ५ | श्री. आर. बी. पाटील<br>गटशिक्षणाधिकारी, लातूर | २४०२१० | ९४२२२४२२१५ |
| ६ | श्री. के. आर. शिंदे<br>गटशिक्षणाधिकारी, औसा | २२०३७८ | ३४२१३७१३१४ |
| ७ | श्री. बी. व्ही. बिरादार<br>गटशिक्षणाधिकारी, निलंगा | २४०५२९ | ९४२३१३५५३३ |
| ८ | श्री. एच. बी. जाधव<br>गटशिक्षणाधिकारी, उदगीर | २५५२०५ | ९४२३०७६३४६ |
| ९ | श्री. एस. बी. सिंदाळकर<br>गटशिक्षणाधिकारी, अहमदपूर | २६२४९७ | ९९२३१८५८४४ |
| १० | श्री. बी. एम. पडवळ<br>गटशिक्षणाधिकारी, चाकूर | २५२४६२ | ९४२१३७३३५९ |
| ११ | श्री. एस. के. लोंढे<br>गटशिक्षणाधिकारी, शिरुर अनंतपाळ | २५०८४२ | ९४२१३९०३५४ |
| १२ | श्री. आर. डी. जाधव<br>गटशिक्षणाधिकारी, देवणी. | २६९९३५ | ९९२३९१७१४३ |
| १३ | श्री. बी. एस. भालके<br>गटशिक्षणाधिकारी, जळकोट | २७५७७६ | ९७६४६७०६६८ |
| १४ | श्री. बी. एम. काळे<br>गटशिक्षणाधिकारी, रेणापूर | २३३३९६ | ९८९०४१९१२७ |





# काही ग्राम शिक्षण समितींनी केलेली उत्कृष्ट सहकार्य

**आपल्या जिल्ह्यात अनेक गावकऱ्यांनी शाळेस भरभरून सहकार्य केलेले आहे. त्या सर्वांचा नामोल्लेख करणे शक्य नाही तथापि प्रातिनिधिक स्वरूपात काही उदाहरणे देत आहोत.**

● जि.प.प्रा.शा.कातपुर ता.लातूर शाळेस श्री अरुण देशमुख यांचेकडून रु.२५०००/– देणगी (०८–०९)● नांदगाव केंद्रा अंतर्गत १० शाळांतील सर्व मुलांना पं.स.सदस्य श्री.पंडीतराव ढमाले यांचेमार्फत टाय वाटप ● जि.प.प्रा.शा.हिप्पळगाव ता.अहमदपूर येथे ग्रामस्थानी रु.६०,०००/– खर्चुन खोली बांधून दिली. ● जि.प.प्रा.शा.हासर्णी ता.अहमदपूर येथील गावकऱ्यांनी शाळेतील विज्ञान प्रयोगशाळा निर्मितीसाठी रु. १५,०००/–, वाचनालयासाठी रु.१५,०००/– दिले असून रु. ६,०००/– स्पिकर संच दिलेला आहे. ● लमाणतांडा हनुमंतनगर काटगाव ता. लातूर वस्तीशाळेस तीन गुंठे जमीन श्री. चव्हाण शामराव रामराव यांचेकडून देणगी. (अंदाजे किंमत २ लाख). ● वाडी–वाडा तांडा काटगाव ता. लातूर वस्तीशाळेस श्री. प्रभू धेनू चव्हाण यांचेकडून अंदाजे दोन लाख रुपये किंमतीची चार गुंठे जमीन देणगी ● रेणापूर तालुक्यामध्ये इनामवाडी येथे गुलाब फड व अनुसया फड यांनी अंदाजे १ लाख रुपये किंमतीची तीन गुंठे जमीन दान केली, वाल्मिकनगर येथे रमेश जगताप १ लाख रुपये किंमतीची तीन गुंठे जमीन दान केली, रेणा कारखाना स्वयंसेविका श्रीमती सुनिता देशमुख यांनी १ लाख रुपये किंमतीची जमीन दान केली तर समसापूर येथे गावकऱ्यांनी एक लक्ष रुपये वर्गणी करुन ५ गुंठे जमीन खरेदी करुन दिली. ● उदगीर तालुक्यामध्ये जनापूर तांडा येथे भानू चव्हाण यांनी दहा हजार चौरस फूट जमीन अंदाजे १ लाख रुपये किंमतीची दान केली, तोंडचिर तांडा येथे वामनराव राठोड यांनी १ लाख रुपये किंमतीची १० हजार चौरस फूट जमीन दान केली तर लोणीमोड येथे शिवाजी गुरुडे यांनी अडीच लाख रुपये किंमतीचा ६० X ६० चा भूखंड दान केला, कुमठा ता. उदगीर येथे अंदाजे ५ लक्ष रुपये किंमतीची संरक्षण भिंत व एक सभागृह गावकऱ्यांनी वर्गणी करुन बांधनू दिले. ● देवणी तालुक्यातील गुरनाळ येथे सौ. कमळाबाई गुरुलिंगअप्पा गताटे यांनी किचन शेडसाठी १५ X १५ चा रुपये २० हजार किंमतीचा भूखंड दान केला. ● शिरुर अनंतपाळ तालुक्यातील शिवपूर येथील निळकंठ देवशटवार या माजी विद्यार्थ्याने शाळेस ३० हजार रुपयाचा संगणक संच देणगी दिला., येरोळ येथील मंगेश चंद्रकांत पाटील यांनी अंदाजे ६० हजार रुपये किंमतीची ५ गुंठे जमीन दान केली. ● निलंगा तालुक्यातील तीन वस्ती शाळांसाठी गावकऱ्यांनी अंदाजे १ लाख रुपये किंमतीची जागा दान केली. व स्वयंसेविका श्रीमती लाळे शीला माधवराव यांनी अंदाजे १ लाख रुपये किंमतीची जागा दान केली. ● रामेगाव झोपडपट्टी ता. औसा येथील श्री. शिवाजी पाटील यांनी ८० X ६० चा भूखंड अंदाजे ३० हजार रुपये किंमतीचा दान केला. ● रावजी तांडा अतनूर ता. जळकोट येथील रेकू कोंडीबा राठोड यांनी अंदाजे ४५ हजार रुपये किंमतीची २० गुंठे जमीन दान केली. ● वासनगाव ता. लातूर येथील श्री. अनंत शिंदे या शिक्षकांनी अंदाजे पावणे दोन लाख रुपये ३ गुंठे जमीन दान केली. ● दामोधर तांडा ता. रेणापूर येथील सौ. जयश्री चव्हाण यांनी अंदाजे १ लाख रुपये किंमतीचा भूखंड शाळेस दान केला. ● अशाच प्रकारे जिल्ह्यात अनेक गावात लोकांनी शाळांना मदत केली आहे, करीत आहेत. आपणही करावी.



